वर्ष १० वे विशेष अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि. २४ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

Email:- dailydivyawarta@Gmail.com Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

अजितदादा बीडचे पालकमंत्री होताच मस्साजोग गावचा मोठा निर्णय

जिल्ह्यासंदर्भात रणनिती काय?

मुंबई , (दिव्य न्युज):- उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडचे पालकमंत्रिपद स्वीकारले, त्या वेळी मस्साजोग गावाने एक निर्णय घेतला आहे. पालकमंत्री म्हणून बीड जिल्ह्यासंदर्भात तुमची रणनीती काय आहे, असा प्रश्न मस्साजोगचे ग्रामस्थ अजितदादांना विचारणार आहेत. त्यासाठी अजित पवार हे मस्साजोगला येतील किंवा ज्या दिवशी अजितदादा बीडला येतील, त्या दिवशी ग्रामस्थ ▸▸ पान २ वर

संयुक्त संसदीय समितीच्या बैठकीत राडा

अरविंद सावंत, असदुद्दीन ओवेसींसह १० खासदार निलंबित

मुंबई, (दिव्य न्युज):- वादग्रस्त वक्फ विधेयकावरील संयुक्त संसदीय समितीचा (जेपीसी) ५०० पानी अहवाल तयार झाला आहे. या अहवालावर शुक्रवार आणि शनिवारी अशी दोन दिवस बैठक होऊन चर्चा होणार होती. मात्र आज आज बैठकीच्या पहिल्या दिवशीच खासदारांमध्ये गदारोळ झाला. ज्यामुळे आता विरोधी पक्षाच्या १० खासदारांना समितीमधून निलंबित करण्यात आले आहे. निलंबित करण्यात आलेल्या खासदारांमध्ये शिवसेना (ठाकरे) पक्षाचे अरविंद सावंत, असुदद्दीन ओवेसी यांचा समावेश आहे. या बैठकीत अहवालावर चर्चा होऊन ते विधि मंत्रालयाकडे दिले जाणार होते. यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सदर विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे.

भाजपाचे खासदार जगदंबिका पाल हे या संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष आहेत. ते म्हणाले की, आज आम्ही जम्मू-काश्मीरमधील शिष्टमंडळ मीरवाईज उमर फारूक यांच्या शिष्टमंडळाला त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी वेळ दिला होता. मात्र संसदेत विधेयकाच्या चर्चेत सहभागी न होणारे असदुद्दीन ओवेसी आज मात्र चर्चेत सहभागी झाले. तसेच तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी माझ्याशी असभ्य वर्तन करत असंसदीय भाषा वापरली. मी त्यांना शांत करण्याचे आवाहन करत होतो. पण ते ऐकायला तयार नव्हते. अखेर भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी खासदारांचे निलंबन करण्याचा प्रस्ताव दिला.

निलंबित करणाऱ्यात आलेल्या ▸▸ पान २ वर

खाजगी डॉक्टरने घातला केज उपजिल्हा रूग्णालयात गोंधळ

पोलिसांकडून प्रतिबंधात्मक कारवाई

केज, (दिव्य न्युज):- एका मद्यपी रूग्णासोबत गेलेल्या खाजगी डॉक्टरने केज उपजिल्हा रूग्णालयात गोंधळ घालून डॉक्टरांसोबत हुज्जत घातल्याचा प्रकार बुधवारी (दि.२२) सायंकाळी घडला. यानंतर पोलिसांनी खाजगी डॉक्टरविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.

सुरज सुभाष मुंडे असे गोंधळ घालणार्या खाजगी डॉक्टरचे नाव आहे. तो एका जखमी असलेल्या मद्यपी रूग्णासोबत केज उपजिल्हा रूग्णालयात गेला होता. यावेळी सचिन ढाकणे नामक व्यक्ती सोबत होती. त्याठिकाणी त्याने मी न्यूरोसर्जन असल्याची बतावणी केली. रूग्णालयात कार्यरत वैद्यकीय अधिकार्यांच्या तपासणीवेळी हस्तक्षेप केला. यावेळी सुरक्षारक्षकांनी बाहेर थांबण्यास सांगताच वैद्यकीय ▸▸ पान २ वर

बापू आंधळे हत्या प्रकरण:आव्हाडांकडून महादेव गितेंचा व्हिडीओ पोस्ट

वाल्मीक कराडच्या सांगण्यावरून हल्ल्याचा आरोप

मुंबई , (दिव्य न्युज):- बापू आंधळे हत्या प्रकरणी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी एक ट्विट केले आहे. यामध्ये त्यांनी जखमी अवस्थेत महादेव गितेंनी तयार केलेला व्हिडीओ पोस्ट केला आहे.दरम्यान महादेव गितेंच्या व्हिडीओमध्ये ते म्हणताय की, बापू अंधाळे मला मारण्यासाठी १५ ते १६ जण घेऊन् आले होते. माझ्यावर हल्ला केल्यानंतर ते म्हणाले वाल्मीक आण्णांनी सांगितले ते लक्षात ठेवा आणि बापू आंधळेंवर गोळीबार केला यात त्यांचा मृत्यू झाला.

जितेंद्र आव्हाडांच्या ▸▸ पान २ वर

महाराष्ट्रात काँग्रेसचं 'मराठा' कार्ड

पटोलेंनंतरचा प्रदेशाध्यक्षपदाचा चेहरा ठरला?

मुंबई , (दिव्य न्युज):- लोकसभेतील यशानंतर विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला सपाटून मार खावा लागला. शंभरपेक्षा जास्त जागा लढलेल्या काँग्रेसला अवघ्या १६ जागा जिंकता आल्या होत्या. यामुळे प्रदेशाध्यक्ष नांना पटोलेंनी या निराशाजनक कामगिरीची जबाबदारी घेत आपल्या पदाचा राजीनामा काँग्रेसच्या हायकमांडकडे पाठवला होता. त्यानंतर पटोलेंनंतर प्रदेशाध्यक्षपदी कुणाची वर्णी लागणार याची राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता आहे. अशातच आता काँग्रेसच्या गोटातून मोठी अपडेट समोर आली आहे. महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पदासाठी पृथ्वीराज चव्हाण,विजय वडेट्टीवार,यशोमती ठाकूर,सतेज ऊर्फ बंटी पाटील, अमित देशमुख यांच्या नावांची जोरदार चर्चा आहे. मात्र, प्रदेशाध्यक्षपदी अनुभवी की तरुण नेत्यांना संधी द्यायची असा पेच काँग्रेस हायकमांडसमोर निर्माण झाला असल्याचे ▸▸ पान २ वर

मांजरा नदीतून वाळू उपसा, परवानगी मात्र उस्मानाबाद जिल्ह्याच्या हद्दीत

केज तालुक्यातील बोरगाव येथे पोलीसच्या पथकाची भेट

केज , (दिव्य न्युज):- बीड आणि धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवरून वाहणाऱ्या मांजरा नदी पात्रातून वाळू उपसा सुरू आहे. मात्र वाळू उपसा करण्याची परवानगी केवळ धाराशिव जिल्ह्याच्या हद्दीत आहे. तर पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक, सहाय्यक पोलीस अधीक्षकांच्या आदेशावरून एका पथकाने केज तालुक्यातील बोरगाव (बु.) येथे नदी पात्रास भेट देऊन वाळू उपसाची पाहणी केली. मात्र कुठल्याची प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही.

बीड आणि धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवरून मांजरा नदी वाहते. नदी पात्रातून वाळू उपसा होत असल्याच्या माहितीवरून पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधिक्षकांच्या आदेशावरून बुधवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास अनिल मंदे, विकास चोपणे, महादेव बहीरवाल, डापकर या पोलीस कर्मचाऱ्यांनी बीड जिल्ह्याच्या हद्दीत येत असलेल्या केज तालुक्यातील बोरगाव (बु.) येथे मांजरा नदी पात्रास भेट दिली. यावेळी वाळू उपसा करणाऱ्या जेसीबी, वाळू वाहतुकीसाठी उभे असलेल्या ट्रॅक्टर आणि हायवा आढळून आल्या. मात्र वाळू उपसा करणाऱ्या व्यक्तींनी पोलीस पथकाला त्यांच्याकडे धाराशिव जिल्हा गौण खनिज विभागाने व कळंब तहसीलदारांनी ठरवून दिलेल्या बहुला व आढाळा (ता. कळंब) हद्दीत वाळू उपसा व वाहतूक करण्याचा परवाना असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यानंतर पथक हे कुठल्याही प्रकारची कारवाई न करता मोकळ्या हाताने परत आले. यावेळी गावातील नागरिकांची मोठी गर्दी जमा झाली. दरम्यान, केज तहसील प्रशासनाला याचा काही थांगपत्ता नाही.धाराशिव जिल्ह्यातील कळंबच्या तहसीलदारांनी बहुला ▸▸ पान २ वर

अल्पवयीन प्रेयसीच्या आईकडून तरुणाची हत्या

दिंद्रुडच्या तरुणाचा पुण्यातील हत्येचा उलगडा

बीड, (दिव्य न्युज):- दिंद्रूड येथील तरुण बालाजी (बाळसाहेब) मंचक लांडे याची पुण्यात हत्या झाली होती. तपासात ही हत्या बालाजीचे अल्पवयीन मुलीशी असलेल्या प्रेमसंबंधातून झाल्याचे स्पष्ट झाले आहे. मुलीच्या आईने तरुणाला पुणे येथे बोलावून घेतले आणि मित्रांच्या मदतीने त्याची हत्या केली.

या प्रकरणात मुलीची आई रेखा भातनासे, रिक्षाचालक दिनेश सूर्यकांत उपादे, आदित्य शरद शिंदे यांना अटक केली.तसेच इतर तीन पान २ वर

धनंजय मुंडेंना झटका! अनेक अधिकारी येणार गोत्यात

हायकोर्टाच्या सुनावणीकडे लक्ष

मुंबई , (दिव्य न्युज):- धनंजय मुंडे यांना मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठानं झटका दिला आहे. यापूर्वीच्या मंत्रीमंडळाच्या कार्यकाळात झालेल्या घोटाळ्यामुळं ते गोत्यात आले आहेत. यामध्ये अनेक अधिकारी देखील गुंतले आहेत. त्यामुळं या अधिकाऱ्यांच्या अडचणीतही वाढ होणार आहे. त्यामुळं हायकोर्टाच्या सुनावणीकडं अवघ्या राज्याचं लक्ष लागून राहिलं आहे.

धनंजय मुंडे कृषिमंत्री असताना फवारणी पंपाच्या खरेदीत घोटाळा ▸▸ पान २ वर

शिक्षकाचा मृतदेह आढळला मृत्यूचे कारण स्पष्ट नाही

केज, (दिव्य न्युज):- खाजगी शाळेवर कार्यरत असलेल्या एका शिक्षकाचा विडा ते पिंपळगाव या दरम्यान मृतदेह आढळून आला. शिक्षकाचा मृत्यू कशामुळे झाला हे मात्र समजू शकले नाही. घटनास्थळी पोलिसांनी जावून पंचनामा केला. मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले.

विदा कराड शाळेवर शिक्षक असलेले पंडितराव भोसले यांचा मृतदेह विडा ते पिंपळगाव रस्त्यावरील कल्याणवाडी फाट्यावर आढळून आला. त्यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला हे मात्र समजू शकले नाही. भोसले यांच्या चेहऱ्यावर वर डोक्याला जखमा होता. त्यांचा मृत्यू वाहनाच्या धडकेने झाला की अन्य कशाने या बाबतचा तपास केजचे पोलीस करत आहेत.

ढाब्यावर जेवण, मग शरण

वाल्मीक कराडचे सीसीटीव्ही ऑडिओ क्लिप व्हायरल

बीड, (दिव्य न्युज):- सरपंच संतोष देशमुख हत्या व दोन कोटी रुपये खंडणी मागितल्याच्या गुन्ह्यात आरोपी असलेल्या वाल्मीक कराड हा शरण येण्याच्या आदल्या दिवशी बीड तालुक्यातील मांजरसुंब्यातील ढाब्यावर जेवला. त्यानंतर आलिशान कारमधून पुण्याला गेला आणि तेथे ३१ डिसेंबर २०२४ रोजी शरण आला. आदल्या दिवशीचे रात्रीचे सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाले आहे. तर दुसऱ्या बाजूला खंडणीच्या गुन्ह्यात दाखल केलेला कराडचा जामीन अर्जही बिनशर्त मागे घेण्यात आला आहे.

याआधी कराडसह सर्वच आरोपी हे विष्णू चाटे याच्या कार्यालयात एकत्रित आल्याचा व्हिडीओदेखील व्हायरल झाला होता. त्यानंतर आता धाराशिव जिल्ह्यातील पारगाव टोलनाक्यावरील आणि एका पेट्रोल पंपावरील कथित ▸▸ पान २ वर

सराईत गुन्हेगार

सरकारी वकिल जितेंद्र शिंदे यांनी से मध्ये कराड हा सराईत गुन्हेगार असून त्याला राजकीय वलय आहे. त्यामुळे त्याला जामीन देण्यात येऊ नये, अशी बाजू मांडली. कराडचे वकील अशोक कवडे यांनी त्याला जामीन मिळावा यासाठी केलेला अर्ज मागे घेतला.

कराडच्या पोटात दुखले, रुग्णालयात दाखल केले

बुधवारी मध्यरात्री वाल्मीक कराड याच्या पोटात दुखायला लागले. बीड कारागृहातून त्याला जिल्हा रुग्णालयात १२:४५ वाजता दाखल केले. पोटाची सोनोग्राफी करण्यासह रक्त व इतर तपासण्या केल्या.यात त्याला लघवीचा संसर्ग झाल्याचा संशय व्यक्त केला. कराड हा गुरुवारी दुपारपर्यंत मिनी आयसीयूमध्ये उपचार घेत होता. वॉर्डच्या बाहेर तगडा बंदोबस्त तैनात होता. उपचार सुरू असल्याची माहिती प्र. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी दिली.

महादेव मुंडेंच्या हत्येचा तपास परळी पोलिसांकडून काढा-आ.धस

वाल्मिक कराडच्या मुलाने पोलिसांना दीडशे फोन का केले?

कोर्टात नेत असतांना कराडसोबत पीए कसा बसेल याची काळजी बल्लाळ घेत होता

बीड (दिव्य न्युज):- महादेव मुंडे यांची हत्या होऊन १५ महिने झाले पण आरोपींचा शोध लागत नाही, यासंदर्भात आज एसपींची भेट घेत परळी पोलिसांनी या प्रकरणी तपास करु नये अशी मागणी केल्याची माहिती भाजप आमदार सुरेश धस यांनी केली आहे.

सुरेश धस पुढे बोलताना म्हणाले की, पोलिस अधीक्षक यांनी कबुल केले आहे की परळी पोलिस हा तपास करणार नाही, हे प्रकरण एलसीबीकडे देण्यात येईल. पण त्यांचे प्रमुख शेख की कोण त्यांना आकानेच त्या ठिकाणी बसवले आहे. त्यामुळे शेख वगळून जबाबदारी द्या अशी विनंती त्यांना केली आहे.

सुरेश धस म्हणाले की, संतोष देशमुख हत्या प्रकरणी आत सीआयडीचे बसवराज तेली यांची मी सोमवारी भेट घेणार आहे. माझ्याकडे जी माहिती आली आहे त्यानुसार कुणाकुणाचे नंबर चेक करायचे याबद्दल त्यांना बोलणार आहे.

सुरेश धस म्हणाले की, महादेव मुंडेंची हत्या करणारे लोकं पुढच्या १५ दिवसांमध्ये सापडले पाहिजे अशी विनंती मी पोलिस अधीक्षकांना केली आहे. बल्लाळ सारखे वागणारे लोकं बीडमध्ये खूप आहेत. त्यामुळेच असे प्रकार होत आहे. बीड जिल्ह्यातील पोलिस या लोकांमुळेच बदनाम झाले आहे.सुरेश धस म्हणाले की, वाल्मीक कराडला कोर्टातून जेलमध्ये नेत असताना त्याचा रोहित कांबळे नावाचा पीए त्यांच्यासोबत कसा बसेल याची काळजी बल्लाळ घेत होता, तो व्हिडीओ माध्यमांनी दाखवला पाहिजे. तो म्हणतो रोहित लवकर या, लवकर या.

सुरेश धस म्हणाले की, संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी आम्हाला कोणत्या जेलमध्ये पाठवा हे सांगायला लागले आहेत. ते लातूरचे जेल कशासाठी मागत आहे हे मला माहिती आहे. ती ऑर्डर झाली तर मग मी सगळे सांगतो.सुरेश धस म्हणाले की, महादेव मुंडे हत्या प्रकरणात रवींद्र सानप हे आरोपीपर्यंत पोहचले होते. त्यांना सांगण्यात आले की राजाभाऊ फड यांच्यासह ५ जणांना अडकवा असे सांगण्यात आले. महादेव मुंडेंचा खून झाला तेव्हा सुशील वाल्मीक कराड, श्री कराड या दोघांनी पोलिस निरीक्षक रवींद्र सानप, विष्णू फड, केंद्रे यांच्यावर १५० कॉल केले. महादेव मुंडेंचा खून झाला तेव्हा यांनी ह्यांना १५० कॉल का केले. मी यांना आरोपी मानत नाही. पण त्यांना इतके कॉल का केले याची तपासणी करावी असे मी एसपींकडे विनंती केली आहे.

तपास अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप

आमदार सुरेश धस यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले की, महादेव मुंडे यांचा खून झाल्यानंतर वाल्मिक कराडचा मुलगा सुशील कराड आणि कराड यांनी पोलिस निरीक्षक रवींद्र सानप , विष्णू फड, गोविंद भदाणे , भास्कर केंद्रे यांच्यासह सहा मोबाईल क्रमांकांवर अर्ध्या तासात १५० वेळा फोन केले होते. खून झाला तेव्हा हे फोन का केले गेले? याचा तपास झाला पाहिजे. तसेच, वाल्मिक कराडला न्यायालयातून कारागृहात नेताना त्याचा पीए कसा काळजी घेत होता, हेही दिसून आले आहे, असेही ते म्हणाले.

पोलिसांवर राजकीय दबावाचा आरोप मी आरोपी मानत नाही पण १५० कॉल करण्याची गरज काय? मुंबईवरून दुबे नावाचे सायबर तज्ज्ञ आहेत. त्यांनी त्यांचे मत नोंदवलेले आहे, असेही धस म्हणाले. परळी पोलीस दलातील बहुतेक लोक हे 'आकानें' निवडलेले आहेत. त्यामुळे महादेव मुंडे यांच्या खुनाचा तपास 'एलसीबी'कडे सोपवावा, अशी मागणी आम्ही केली आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी देखील अशी मागणी केली आहे, असेही ते म्हणाले.

एसआयटी प्रमुखांची भेट घेणार

काही पोलीस कर्मचारी पंधरा वर्षांपासून एकाच ठिकाणी आहेत. मी रश्मी शुक्लायांची भेट घेणार आहे. या प्रश्नावर पोलीस अधीक्षक यांनी 'एलसीबी'कडे तपास देण्याचे मान्य केले आहे. संतोष देशमुख खून प्रकरणातील एसआयटी प्रमुख बसवराज तेली यांची भेट मी सोमवारी घेणार आहे, असेही धस यांनी सांगितले.

वाल्मिक कराडवर गंभीर आरोप

बल्लाळ यांच्यासारखे लोक बीडमध्ये वाढले. त्यामुळे असे प्रकार वाढले आहेत. काही आरोपी लातूरचे जेल मागत आहेत, ते का? रवी सानप हा स्वाभिमानी अधिकारी आहे. त्याला काही जणांची नावे टाकण्यास सांगितले होते, परंतु त्यांनी ते केले नाही, असा आरोप देखील धस यांनी केला आहे.

अलखैर पतसंस्थेच्या वतीने बेरोजगार तरूणाला सीएनजी ॲटो वितरित

अंबाजोगाई, (दिव्य न्युज):- शहरातील गवळीपुरा भागातील बेरोजगार तरुण युवक जावेद जुम्मा रेगीवाले यांना अलखैर नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने आरई सीएनजी ॲटोची चावी देवून त्यांच्या रोजगाराला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. अलखैर नागरी सहकारी पतसंस्था ही सतत अंबाजोगाई शहरातील बेरोजगार तरुणांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी उपलब्ध करुन देत आहे. अंबाजोगाई शहरात गेल्या वीस वर्षाच्या कालखंडात हजारो बेरोजगार तरुणांना व व्यवसायिकांना स्वावलंबी बनविण्याचे काम करण्यात आले आहे. ही पतसंस्था आर्थिक कमाईसाठी नाही तर समाजातील जे आर्थिक दारिद्रय आहे ते संपविण्यासाठी अल्पशा सेवा शुल्कावर कर्ज वितरण करुन रोजगारासाठी हातभार लावत असते. गुरुवारपेठ भागातील बेरोजगार तरुण युवक जावेद जुम्मा रेगीवाले यांना आरई सीएनजी ॲटोचे वितरण दै.वार्ताचे संपादक परमेश्वर गित्ते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इंजि. अकीकोद्दीन काझी, आयजोद्दीन काझी, तुळशीराम मारवाळ, शेख इर्शाद भाई, विशाल मारवाळ, फेरोज पठाण व पतसंस्थेचे व्यवस्थापक सय्यद रउफ आदींची उपस्थिती होती.

दिवाणी न्यायालयात जन्म-मृत्यु प्रकरण वर्ग करण्याची मागणी

कळमनुरी, (दिव्य न्युज):- जन्म मृत्युचे प्रकरणे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर यांच्याकडे चालविल्या जात होतेय मागील काळात शासन राज्यपत्रक दिनांक ११ ऑगस्ट २३ व गृह विभागा कडून अधिसूचना १० सप्टेबर २३ नुसार संबंधित प्रकरण उपविभागीय त्यानंतर तहसील कार्यालयात मध्ये वर्ग करण्यात आली होती ज्यात संबंधित कामकाज दैनंदिन सुरु असतांना २१ जानेवारी २४ मंगळवारी आलेल्या शासनादेश मध्ये जन्म मृत्यु प्रकरणेमध्ये स्थगिती दिली ज्यामुळे दाखल असलेल्या प्रकरणे प्रलंबित राहिले त्यामुळे नागरिकांची गैरसोई होणार असुन यात नागरिकांना न्यायापासुन वंचित राहावे लागणार आहे यामुळे संबंधित जन्म मृत्युचे प्रकरणे मा दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर यांच्याकडे हस्तातंरित वर्ग करण्यात यावे त्यानिमित्त जन्म मृत्यु प्रकरणामध्ये खऱ्या लोकांना न्याय मिळू शकते त्यादृष्टि भावनाने कळमनुरी सर्व वकिलांकडून केंद्रीय कायदा व न्यायमंत्र्यांकडे निवेदना द्वारे विनंती अँड मनोज देशमुख. अँड व्ही टी माखणे. अँड तातेराव देशमुख अँड एल सिरसाट अँड डि पी जाधव अँड सुरेश गरड अँड अविनाश काळे अँड विलास खंदारे. अँड प्रभाकर मोरे.अँड शकील शेख. अँड प्रदीप तड़स आदीने केली आहे..

प्रधानमंत्री आवास योजनेचा नागरिकांनी घ्यावा-मोहम्मद असरार,सय्यद नदीम

बीड , (दिव्य न्युज): -गरिबांचे घराचे स्वप्न साकार व्हावे यासाठी शासनाकडून राबांवण्यात येत असलेली प्रधानमत्री आवास योजना शहरी २.० टप्पा सुरू झाली आहे यासाठी ऑनलाइन फॉर्म भरून मागविण्यात येत आहेत. तरी बीड नगरपरिषद हद्दीतील शहरातील वार्ड क्रमांक १५,१६ चे नागरिकानी संपूर्ण कागदपत्राच्या मूळ प्रतींसह ऑनलाइन नोंदणी करून प्रधानमत्री आवास योजना शहरी २.० चा जास्तीत जास्त प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन समाज सेवक. मोहम्मद असरार सय्यद नदीम यांनी केले आहे.

पान १ वरून

जिल्ह्यासंदर्भात

अजितदादांना येऊन भेटणार आहेत, असा निर्णय गावकऱ्यांनी घेतला आहे, असे मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी सांगितले.

संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपींना लवकरात लवकर शिक्षा व्हावी, यासाठी अकोला येथे आज आक्रोश मोर्चा काढण्यात आला. त्या मोर्चात सहभागी होण्यासाठी धनंजय देशमुख, संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख अकोल्यात आले होते, त्या वेळी माध्यमांशी बोलताना मस्साजोग ग्रामस्थांनी घेतलेला निर्णय धनंजय देशमुखांनी सांगितला.

धनंजय देशमुख म्हणाले, आम्हाला न्याय मिळवताना पालकाची काय जबाबदारी आहे किंवा पालकमंत्र्यांना काय सांगायचे आहे, याबाबतचा निर्णय गावाने घेतला आहे. त्यासाठी एक तर अजितदादा मस्साजोगला येतील किंवा मस्साजोगचे ग्रामस्थ ज्या दिवशी दादा बीडला येतील, तेव्हा त्यांना भेटायला बीडमध्ये येतील, असा निर्णय गावकऱ्यांनी घेतला असून त्यांनी तो मला कळविला आहे.

संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपीला फाशीची झाली पाहिजे, असे मत धनंजय मुंडे यांच्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीचे आहे. मात्र, लोकप्रतिनिधींनी फक्त मत व्यक्त करून चालणार नाही. त्यांना काहीतरी क्शन घ्यावी लागेल. नुसती खंत व्यक्त करून किंवा श्रद्धांजली वाहून काम होणार नाही. लोकप्रतिनिधींनी भूमिका घेतली पाहिजे, अशी अपेक्षा धनंजय देशमुख यांनी व्यक्त केली.

जे आरोपी आहेत, त्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, असे नुसतं म्हणून चालणार नाही. न्यायासाठी आम्हीही वणवण फिरतोय, आम्हीही घरात बसून आरोपीला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, असं म्हणू शकलो असतो. पण लोकप्रतिनिधींनी त्यासंदर्भात एक भूमिका घेतली पाहिजे. न्यायासाठी आम्ही एक पवित्रा घेतला आहे, त्याप्रमाणे त्यांनी काय केलं आहे, असा सवाल धनंजय देशमुख यांनी केला.

संपूर्ण जिल्हा हे पालकमंत्र्यांचं कुटुंब असतं. आमचा अजित पवार यांच्यावर विश्वास आहे. अजितदादा आम्हाला जरुर न्याय देतील आणि आम्ही त्यांच्याकडून तीच अपेक्षा करतोय. जे आरोपी आहेत, त्यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी आणि आम्हाला लवकरात लवकर न्याय द्यावा, अशी अपेक्षा संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हिने व्यक्त केली.

खाजगी डॉक्टरने

अधिकार्यांसह सुरक्षारक्षक, कर्मचार्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. कर्मचार्यांच्या अंगावर जाऊन धमक्या देत मारहाण करण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी सर्व वैद्यकीय अधिकारी, कर्मचार्यांनी केज पोलिसात तक्रार दिली. त्यानंतर केजचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी डॉ.सुरज मुंडे यास ठाण्यात बोलावून प्रतिबंधात्मक कारवाई केली. त्याने दिलगिरी व्यक्त केल्याने प्रकरण थांबले. यादरम्यान पोलिसांनी 'प्रसाद' दिल्याने डॉक्टरला चांगलीच अद्दल घडली आहे.

बापू आंधळे हत्या

ट्विटमध्ये म्हटलंय की, २९ जून २०२४ रोजी महादेव गित्ते यांच्यावर झालेला हल्ला हा वाल्मिक कराड याच्या इशाऱ्यावर झाला होता. त्यांनी अंबाजोगाई येथील वैद्यकीय महाविद्यालयातील महादेव गित्ते यांच्या उपचाराचा एक व्हिडीओ शेअर केला. या पोस्टमधील व्हिडीओमुळे प्रकरणाचा तपास पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे.

जितेंद्र आव्हाड यांनी केलेल्या ट्विटमध्ये महादेव गिते म्हणाले की, माझ्या घरी शिनगारे, आंधारेसह एक जण आला. तु वाल्मीक आण्णाचे काम का करत नाही, असा सवाल करत तुला मारायला सांगितले आहे. मी त्यांच्या पाया पडलो, आणि त्यांना तिथून पाठवून दिले पण जाताना त्यांनी मला धमकी दिली की आज संध्याकाळी आम्ही तुला ठार मारणार आहोत. तुझा बाप बबन गिते याला पण गुंतवायची तयारी झाली आहे. अन् निघून गेले. त्यानंतर थोड्याच वेळात १५ ते १६ जणांनी माझ्या घराावर दगडफेक केली आणि माझी गाडीदेखील फोडली. बापू आंधळे ओळखीच्या असल्याने मी बाहेर आलो तर त्यांने मला मारायला सुरुवात केली. तर त्याने मला सांगितले की वाल्मीक बाबूराव कराड याने तुला जीवे मारण्याचे सांगितले आहे. यावेळी त्यांनी माझ्यावर गोळीबार केला. यात मला ३ गोळ्या लागल्या. यातच वाल्मीक आण्णांनी सांगितलेला लक्षात ठेवा असे एकमेकांना म्हणत बापू आंधळेला या लोकांनी गोळ्या घातल्या अन् त्यांचा यात मृत्यू झाला. अन् त्यांच्यासोबतचे सर्व जण फरार झाले. माझ्याकडे त्यावेळी काहीच हत्यार नव्हते. माझ्यासह कुटुंबीयांना जर काही झाले तर त्याला वाल्मीक कराड जबाबदार राहील. हे सर्व घडत असताना बबन गिते हे माझ्या घराजवळ नव्हते, त्यांच्या ह्या घटनेशी काही संबंध नाही.

परळीमधील मरळवाडी येथील सरपंचाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. यात नंदागौळ येथील ग्यानबा मारोती गित्ते जखमी आणि महादेव गीते हे दोघे गोळीबारात गंभीर जखमी झाले. याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते, बबन गित्ते यांच्यासह पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. आर्थिक देवाणघेवाणीतून हा गोळीबार झाल्याचे 'एफआयआर'मध्ये नमूद करण्यात आले. बापूराव आंधळे व ग्यानबा गीते यांना परळी येथील महादेव गीते यांच्या घरी बोलवले होते. त्या ठिकाणी बबन गित्ते यांनी पैसे आणलेस का? असे म्हणत बापूराव आंधळे यांना शिवीगाळ केली. बापूराव आंधळे यांनी शिवी देऊ नको असे म्हणताच बबन गित्ते यांनी कमरेचे पिस्तूल काढून आंधळे यांच्या डोक्यात गोळी मारली तसेच राजाभाऊ नेरकर यांनी कोयत्याने मारहाण केली. महादेव गीते याने ग्यानबा गीते यांना गोळी मारली. परंतु ती त्यांच्या छातीला चाटून गेल्याने ते जखमी झाले. या प्रकरणात आता महादेव गितेच्या व्हिडिओमुळे नव्याने तपास होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महाराष्ट्रात काँग्रेसच

बोलले जात होते. पण अखेर तरुण नेत्यालाच या पदावर संधी देण्याच्या विचारात काँग्रेसचे पक्षश्रेष्ठी आहेत.

महाराष्ट्रातून काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदासाठी दोन नावांत जोरदार रस्सीखेच सुरू आहे.अमित देशमुख आणि सतेज पाटील या दोन नावावर हाय कमांड कडून विचार सुरु अमित देशमुख यांच्या गळ्यात प्रदेशाध्यक्षपदाची माळ पडण्याची दाट शक्यता आहे. काँग्रेसकडून अमित देशमुख यांच्या नावाची अधिकृत घोषणा सोमवारपर्यंत होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

कारण सतेज पाटलांनी यापूर्वीच आपल्या कोल्हापूर जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारूण पराभवामुळे जिल्ह्यातील काँग्रेसची घडी विस्कटलेली आहे. त्यामुळे स्थानिक राजकारणावर पकड ठेवण्यासाठी सतेज पाटील यांनी प्रदेशाध्यक्ष पदाला नकार कळवल्याची देखील माहिती समोर आली होती.

महाविकास आघाडीतील शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यासारख्या दोन मुरब्बी राजकीय नेत्यांशी कधी जुळवून तर कधी बेधडक वागत नाना पटोलेंनी आपलं राजकीय चातुर्य गेले ४ वर्ष दाखवलं होतं. त्यांनी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला दमदार यशही मिळवून दिलं होतं. त्यामुळे साहजिकच नानांचं महाराष्ट्रातलं वजन वाढलंच तसंच दिल्लीतही त्यांचा दबदबा वाढला. पण विधानसभा निवडणुकीतही त्यांच्यावरच महाराष्ट्राची जबाबदारी कायम ठेवली. यश मिळालं तरी नेतृत्व बदलण्याची भाजपसारखी धमक काँग्रेसनं दाखवली नाही.

नाना पटोलेंनी महायुतीसह महाविकास आघाडीलाही शिंगावर घेतलं. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीवेळी जागावाटपात कोणतीही नमती भूमिका न घेता उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत प्रसंगी राजकीय कटुता घेत काँग्रेसच्या पारड्यात जास्तीत जास्त जागाही पाडून घेण्यातही त्यांना यश आलं.

पण विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेससह महाविकास आघाडीच्या विरोधात अनपेक्षित व तितकाच धक्कादायक निकाल लागला. महाविकास आघाडीची दाणादाण उडाली. २८८ जागा लढलेल्या आघाडीला अवघ्या ४९ जिंकता आल्या. त्यात काँग्रेसला तर फक्त १६ जागांवरच विजय मिळवता आला. यामुळे काँग्रेसनं प्रदेशाध्यक्ष बदलाचं मनावर घेतलं.

अल्पवयीन प्रेयसीच्या

आरोपी फरार आहेत. त्यांचा शोध पोलीस घेत आहेत. मृत बालाजी सावत्र आईसोबत राहत होता. १५ वर्षांपूर्वी त्याच्या वडिलांनी आत्महत्या केली होती. त्याही अगोदर त्याची सख्खी आई त्याला सोडून माहेरी गेली होती. सावत्र आई सरस्वती यांनीच त्याला सांभाळले. सरस्वती लांडे म्हणाल्या, ३ वर्षांपासून रेखा भातनासे बालाजीला माझ्या मुलीसोबत लग्न लावून देते असे सांगत होती. त्याला कंपनीत काम करायला लावून पगार ती घेत होती. ६ महिन्यांपासून तो दिंद्रूडला आल्याने तिला पैसे मिळत नव्हते, म्हणून तिने बालाजीला पुण्याला बोलावून घेत खून केला. माझी म्हातारपणाची काठी कायमची हरवली, असे त्या म्हणाल्या.

मांजरा नदीतून व

व आढाळा या गावालगतच्या नदी पात्रातुन वाळू उपसा करण्याची हद्द ठरवून दिलेली असताना केज तालुक्यातील बोरगांव (बु.) येथील सर्वे.नं.१४२, १४, १४३ या ठिकाणी नदीपात्रातून मोठे मोठे खड्डे करून अवैध वाळू उपसा केलेला आहे. तर सिध्देश्वर लांडगे हे राजकीय पुढाऱ्यांना हाताशी धरून २ जेसीबी व १५ ट्रॅक्टरच्या मदतीने रात्रंदिवस वाळूचा उपसा करीत आहेत. तर उपसा केलेली वाळु ही वाळू डेपोत न जाता इतरत्र विक्री केली जात आहे. बोरगाव या ठिकाणी केलेल्या वाळू उपसाचा पंचनामा करून सदरील गुत्तेदाराकडून रक्कम वसूल करावी, तात्काळ वाळू उपसा बंद करण्यात यावा. नसता ग्रामस्थांसह उपोषणास बसू असा इशारा बोरगाव (बु.) येथील विकास नवनाथ शिंदे यांनी केजच्या तहसीलदारांना लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

धनंजय मुंडेंना झटका!

झाला होता. याप्रकरणावर मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठात २९ जानेवारीला सुनावणी होणार आहे. हायकोर्टाच्या या सुनावणीकडं राज्याचं लक्ष लागून राहलं असून यामध्ये जे जे अधिकारी गुंतले आहे, त्यांचा अडचणीत वाढ होणार आहे. यामध्ये २,६०० रुपयांचा कृषीपंप ३,६५० रुपयाला खरेदी करण्यात आलं होतं. मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठानं राज्य सरकारकडं याबाबत स्पष्टीकरण मागितलं होतं.

दरम्यान, कृषी सचिवांना नकार देऊनंही तत्कालीन कृषिमंत्र्यांनी फवारणीपंपांची अतिरिक्त दरानं खरेदी केली होती. कृषी विभागाने ५ डिसेंबर २०१६ रोजी कृषी साहित्य खरेदीसाठी डीबीटी योजना सुरू केली होती. २०२३ मध्ये राज्य सरकारनं कृषी साहित्य खरेदीच्या धोरणात बदल का केला? अशी विचारणा मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठानं केली आहे. यासंदर्भात राजेंद्र मात्रे यांनी नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल केली आहे.

ढाब्यावर जेवण,

सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाले आहे. हे फुटेज ३० डिसेंबर २०२४ रोजीचे असल्याचे सांगण्यात येत असून दुसऱ्याच दिवशी तो पुण्यात सीआयडीला शरण आला होता. कराडला फरार असताना जिल्ह्यातील कोणी कोणी मदत केली, याची माहिती सीआयडी घेत आहे.

वाल्मीक कराड याची कथित ऑडिओ क्लीपही व्हायरल झाली आहे. यात तो बीड शहर ठाण्याचे पोलिस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्याशी संवाद साधत आहे. सनी आठवले याला सहकार्य करा, असे संभाषण यात आहे. आठवले यानेच ही क्लीप सोशल मीडियावर अपलोड केली आहे. परंतु, या क्लीपशी आपला काहीही संबंध नाही. सनी हा बनावट नोटा आणि गोळीबार प्रकरणात फरार आहे. पोलिसांवर दबाव आणण्यासाठी तो असे प्रकार करत असल्याचे बल्लाळ म्हणाले.

जे व्हिडीओ, सीसीटीव्ही फुटेज मीडियाच्या हाती लागतात ते तपास करणाऱ्यांच्या हाती का लागत नाहीत, असा सवाल संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी उपस्थित केला आहे. तसेच तपासाची माहिती दिली जात नसल्याचा आरोप त्यांनी केला.

संयुक्त संसदीय

खासदारांमध्ये कल्याण बॅनर्जी, मोहम्मद जावेद, ए. राजा, असदुद्दीन ओवेसी, नसीर हुसेन, मोहिबुल्ला, मोहम्मद अब्दुल्ला, अरविंद सावंत, नदीम-उल हक आणि इम्रान मसूद यांचा समावेश आहे.आजच्या बैठकीची सुरुवात गोंधळाने झाली. विरोधी पक्षातील खासदारांनी आरोप केला की, त्यांना विधेयकात जे बदल सुचविले आहेत, त्या नव्या मसुद्याचा अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ दिलेला नाही. काँग्रेसचे खासदार इम्रान मसूद यांचे संसदीय समितीमधून निलंबन झाल्यानंतर त्यांनी म्हटले की, सरकारला वक्फच्या मालमत्तांवर नियंत्रण हवे आहे.

लोकसभेत सादर झालेल्या वक्फ विधेयकामध्ये ४४ दुरुस्त्या सुचवण्यात आल्या आहेत. या प्रत्येक दुरुस्तीवर 'जेपीसी'च्या दोन दिवसांच्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करणे अपेक्षित होते. राज्या-राज्यांतील वक्फ मंडळांकडे १९५०मध्ये ३५ हजार जमिनी होत्या, गेल्या ७५ वर्षांमध्ये त्यांची संख्या वाढून तब्बल १० लाख झाली आहे. त्यातील अनेक जमिनी वक्फ मंडळाने बळकावल्याचा दावा 'जेपीसी'तील सत्ताधारी भाजपच्या सदस्यांनी केला आहे. या जमिनींच्या मालकीहक्काबाबत पूर्वलक्ष्यी प्रभावाने फेरआढावा घेतला पाहिजे, अशी मागणी 'जेपीसी'मध्ये करण्यात आली.

'जेपीसी'च्या आतापर्यंत झालेल्या ३४ बैठकांपैकी बहुतांश वादळी ठरल्या होत्या. तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांची बाटली फोडण्यापर्यंत मजल गेली होती. काँग्रेस, द्रमुक, शिवसेना-ठाकरे गट आदी विरोधी सदस्यांनी विधेयकातील दुरुस्त्यांना कडाडून विरोध केला होता. त्याची पुनरावृत्ती आजच्या बैठकीतही पाहायला मिळाली.

कोट्यावधी मराठ्यांचा अपमान करायचा नसेल तर पाटलांवर उपोषणाची वेळ येवू देऊ नका

सगळे सोयरे, हैदराबाद गॅजेट लागू करण्याची मागणी सरकारने अजूनही मान्य केलेली नाही, ती मान्य करावी!

पाटलांची तब्येत चांगली नसल्यामुळे यापुढे उपोषण झेपणार आणि पेलणार नाही याचं भान सरकारने ठेवावे!

मनोज जरांगे पाटलांचे सहकारी प्रदीप दादा सोळंके यांची सरकारकडे मागणी

अंतरवाली सराटी

मराठ्यांच्या न्याय मागण्यासाठी मागील अनेक वर्षापासून झगडत असलेले मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी आतापर्यंत अनेक वेळा उपोषणे केले आहेत . त्यांनी केलेल्या आंदोलनामुळेच सरकारने शिंदे समिती स्थापन केली . त्यांच्यामुळेच मराठ्यांचे महत्त्वाचे पुरावे सापडले आणि त्यांच्यामुळेच महाराष्ट्रातील लाखो मराठ्यांना कुणबीचे प्रमाणपत्र मिळाले . मराठा आरक्षणाचा बहुतांशी प्रश्न मनोज जरांगे पाटील यांच्यामुळेच मार्गी देखील लागला आहे . आता मनोज जरांगे पाटील यांची सगे सोयरे आणि हैदराबाद गॅजेट लागू करण्याची मागणी आहे . ती मागणी सरकारने अजूनही मान्य केलेली नाही . या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचा संघर्ष सुरूच आहे . ते उद्यापासून उपोषणाला बसत आहेत . मात्र अनेक वेळा उपोषण करून आणि महाराष्ट्रात सतत दौरे केल्यामुळे त्यांची तब्येत आता चांगली राहिलेली नाही . त्यांच्या अंगात शक्ती नसल्यामुळे त्यांना यापुढील काळात उपोषण झेपणार आणि पेलणार नाही याचं भान सरकारने ठेवून मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीचा विचार करून त्यांना उपोषण करण्याची वेळच येऊन देऊ नाही त्यांची मागणी उपोषणाला बसण्या अगोदरच मान्य करावी आणि प्रजेच्या हिताची ही मागणी असल्यामुळे येणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने या मागणीला मूर्त रूप देऊन प्रजासत्ताक दिनाचा सन्मान करावा, अशी मागणी महाराष्ट्रातील ख्यातनाम लेखक वक्ते कथाकार आणि मनोज जरांगे पाटील यांचे खंबीर सहकारी प्रदीप दादा सोळंके यांनी केले आहे .

मराठ्यांच्या न्याय हक्कासाठी मागील अनेक वर्षापासून लढा

● मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील महाराष्ट्रातील कोट्यावधी मराठ्यांच्या न्याय हक्कासाठी मागील अनेक वर्षापासून लढा देत आहेत . त्यांनी आतापर्यंत अनेक वेळा महाराष्ट्राच्या विविध ठिकाणी उपोषणे केले आहेत .

● सुरुवातीच्या काळात त्यांच्या उपोषणाची योग्य दखल सरकारने घेतली नव्हती मात्र मराठ्यांना न्याय मिळाल्याशिवाय मागे हटणार नाही हा त्यांनी घेतलेला पवित्रा सरकारला विचार करायला लावणारा ठरला आणि गेल्या वर्षीपासून अंतरवाली सराटी येथे सुरू केलेल्या लढ्याला जरांगे पाटलांच्या पवित्र आंदोलनामुळे यश आलं . सरकारला जरंगे पाटलाच्या मागण्या मान्य करीत कुणबी प्रमाणपत्र द्यावे लागले . सुरुवातीला जरांगे पाटलाचे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्नही झाला . लोकांना लाट्या काठ्याने एवढेच नाही तर बंदुकीच्या गोळ्याचा सामना करावा लागला मात्र पाटील या आंदोलनातून मागे सरले नाही .

● मरण आलं तरी हरकत नाही परंतु मागे हटणार नाही हा निर्णय जरांगे पाटलांनी घेतल्यामुळे महाराष्ट्रातील कोट्यावधी समाज त्यांच्या पाठीमागे ठाम उभा राहिला आणि त्यातूनच सरकारला भूमिका घ्यावी लागली .

लाखो मराठ्यांची आंतरवालीकडे कुच

● मराठा योद्धा मनोज जरंगे पाटील यांची तब्येत खराब असली तरी मराठ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आपल्या प्राणाची बाजी लावली आहे . ते २५ जानेवारीपासून उपोषणाला बसणार आहेत .

● या आंदोलनामध्ये आपला सहभाग असला पाहिजे याची जाणीव महाराष्ट्रातील लाखो मराठ्यांना आहे म्हणून आपले सर्व कामे सोडून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो मराठ्यांची फौज अंतरवालीकडे कूच करताना दिसून येत आहे .

● २५ जानेवारीला आंतरवाली परिसरात उभा रहायला देखील जागा पुरणार नाही अशी परिस्थिती पाहायला मिळत आहे .

महाराष्ट्रातील कोट्यावधी समाज जरांगे पाटील यांच्या पाठीशी

● सरकारने समिती नेमल्यानंतर जे पुरावे सापडले त्या पुराव्याच्या आधारे प्रमाणपत्र वाटप केले आहेत मात्र ज्यांच्याकडे पुरावे नाहीत त्यांना अद्यापही कुणबी प्रमाणपत्र मिळालेले नाहीत . महाराष्ट्रातील सर्व मराठे कुणबी आहेत यासाठी सगे सोयरे आट लागू करा तसेच हैदराबाद गॅजेट लागू करावे आणि महाराष्ट्रातील सर्व मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावेत अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केलेली आहे . या मागणीला सरकारने होकार देखील दिला होता तशा पद्धतीचा मसुदाही तयार करण्यात आला होता मात्र त्याला अद्यापही सरकारने मान्यता दिली नाही . हे सगेसोयरे आणि हैदराबाद गॅजेट अद्यापही लागू करण्यात आलेले नाही . त्यामुळे जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाचा निर्णय घेतला आहे . येत्या २५जानेवारीला जरांगे पाटील उपोषणाला बसणार आहेत महाराष्ट्रात त्यांनी दौरे केले आहेत आणि या उपोषणाला संपूर्ण महाराष्ट्रातील कोट्यावधी समाज जरांगे पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे आहे .

एक वर्ष झालं सरकारनं आश्वासन पाळलं नाही!

अंतरवाली सराटी या ठिकाणी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांना सातव्यांदा सामूहिक अमरण उपोषण करावा लागत आहे हे खूप दुर्दैवाची गोष्ट आहे . २६ जानेवारी २०२४ रोजी वाशी मुंबई येथे मुख्यमंत्री साहेबांनी दिलेला शब्द पाळला नाही . सगे सोयरे, हैदराबाद गॅझेट, बॉम्बे गॅजेट, सातारा गॅजेट हे सर्व लागू करणार असे मुख्यमंत्री साहेबांनी सांगितले होते परंतु आज वर्ष होऊन गेले तरी यातली एकही गोष्ट सरकारने पूर्ण केली नाही त्यामुळे आता परत मनोज जरांगे पाटलासारख्या व्यक्तीला मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसावं लागत आहे . मनोज दादाची तब्येत आता उपोषणाला साथ देणारी नाही त्यामुळे त्यांच्या जीवाला काही धोका झाल्यास यास सर्वस्वी सरकार जबाबदार राहील सरकारने मराठा समाजाचा अंत बघू नये मराठा आरक्षणाचा प्रश्न लवकर मार्गी लावावा

● **मनीषा मराठी**, छत्रपती संभाजी नगर

मराठ्यांचे क्रांतीसुर्य जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची काळजी घेणे सरकारची जबाबदारी

● जरांगे पाटील यांची तब्येत अत्यंत खालावलेली आहे त्यांना नीट बसताही येत नाही नीट चालता येत नाही आणि अनेक वेळा उपोषण केल्यामुळे ते नेहमी त्रस्त असतात . त्यांना यापुढील उपोषण करणं अवघड आहे . याची जाणीव संपूर्ण महाराष्ट्रातील कोट्यावधी मराठा समाजाला आहे . त्यामुळे महाराष्ट्रातील समस्त मराठा समाजाच्या वतीने जरांगे पाटील यांना विनंती करण्यात आलेली आहे . की या पुढील काळात मराठ्यांच्या आरक्षणासाठी आपण उपोषण करू नका . आपण दिलेल्या लढा हा खूप मोठा आहे आणि या लढ्यातून बरंच प्रमाणात यश मिळालेले देखील आहे . उर्वरित आंदोलन हे आपण वेगळ्या मार्गाने करावं . मराठ्यांच्या हक्क पदरात पाडून घ्यावा अशी मागणी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून होत आहे या मागणीचा सारासार विचार करून महाराष्ट्राचे ख्यातनाम वक्ते आणि जरांगे पाटील यांचे सहकारी प्रदीप दादा सोळंके यांनी शासनाकडे मागणी केली आहे की मराठ्यांचे क्रांतीसुर्य जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची, तब्येतीची काळजी सरकारने घेतली पाहिजे . जरांगे पाटील यांच्या सतत उपोषणामुळे आणि महाराष्ट्राच्या सतत दौऱ्यामुळे त्यांची तब्येत खालावलेली आहे . यापुढील उपोषण त्यांना झेपणारे अथवा पेलणारे नाही त्यामुळे त्यांनी उपोषण करणे हे त्यांच्या जीवितास धोका ठरू शकतो . संपूर्ण महाराष्ट्रातील कोट्यावधी समाजाचे दैवत असणार जरांगे पाटील नावाचे व्यक्तिमत्व यांचा जीव धोक्यात घालणं हे सरकारला देखील परवडणार नाही . त्यामुळे सरकारनं दिलेलं आश्वासन पाळीत जरांगे पाटील यांची मागणी मान्य करावी . जरांगे पाटील यांनी प्रजेच्या हिताचीच मागणी सरकारकडे केली आहे . महाराष्ट्रातील कोट्यावधी समाज या मागणीला धरून संघर्ष करत आहे आणि प्रजेचं राज्य असल्यामुळे उद्याच्या प्रजासत्ताक दिनाचा सन्मान करण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांची मागणी मान्य करावी आणि जरांगे पाटील यांना उपोषणापासून रोखाव अशी मागणी प्रदीप दादा सोळंके यांनी केले आहे .

बहुजन समाज पार्टीची बीड जिल्हा कमिटी बरखास्त-ॲड.सुनील डोंगरे

बीड , (दिव्य न्युज):-बुधवार दि.२२/०१/२०२५ रोजी बीडमध्ये झालेल्या जिल्हा समीक्षा बैठकीमध्ये ब स पा चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा.एड. सुनीलजी डोंगरे यांनी बीड जिल्हा कमिटीची समीक्षा घेतली तसेच बहन कुमारी मायावती जी यांच्या वाढदिवसानिमित्त जनक कल्याणकारी कार्यक्रमाची माहिती दिली.दि.१५ जानेवारी रोजी संपूर्ण देशामध्ये बहन कुमारी मायावती जी यांच्या वाढदिवसानिमित्त जनकल्याणकारी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.बीड जिल्ह्यात देखील १५ जानेवारी रोजी कार्यक्रमाचे आयोजन करून प्रबोधन करण्यात आले व बसपाची विचारधारा सांगण्यात आली.

विधानसभा निवडणुकीनंतर ब स पा चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा.एड. सुनीलजी डोंगरे यांची बीड जिल्ह्याला पहिलीच भेट होती याप्रसंगी निवडणुकीबाबत समीक्षा करून निवडणुकीमध्ये काम करणाऱ्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमात बोलत असताना मा.एड.सुनीलजी डोंगरे म्हणाले की,येणाऱ्या काळामध्ये देशातील जनतेला ब स पा शिवाय कोणताही पर्याय असणार नाही कारण आतापर्यंतच्या सर्व निवडणुकीमध्ये ब स पा ला हरवण्यासाठी सर्व पक्ष एकत्र येतात त्याचबरोबर वेगवेगळ्या आघाड्या निर्माण करतात परंतु बहुजन समाजाला याची जाणीव होऊ देत नाहीत की,या सर्व आघाड्या बहुजन समाज पार्टीचे मत कमी करण्यासाठी केल्या जातात परंतु आता समाज जागृत झाला आहे व भाजपा व त्यांच्या सोबतच्या सर्व पक्षांची नीती समाजाने ओळखून घेतली आहे म्हणून येणाऱ्या काळात ब स पा शिवाय कोणताही पर्याय जनतेच्या समोर राहणार नाही.पुढे बोलताना मा.एड.सुनीलजी डोंगरे म्हणाले की, येणाऱ्या काळात महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ब स पा नेहमीप्रमाणे स्वबळावरच लढणार आहे त्याची तयारी म्हणून बीड जिल्ह्यातील कमिटी बरखास्त करून नव्याने करण्यासाठी काम सुरू करण्यात आले आहे.याकरिता झोनप्रभारी मुकुंद सोनवणे व प्रशांत वासनिक हे बीड जिल्ह्यामध्ये सर्व विधानसभा मध्ये भेट देऊन त्या ठिकाणी नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करणार आहेत तरी सध्या असलेली कमिटी ही बरखास्त करण्यात आली आहे तसेच प्रदेश कडून बीड जिल्ह्याकरिता नियुक्त करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांची देखील नव्यानव्याने नियुक्ती करण्यात येणार आहे.बीड जिल्ह्यामध्ये नवीन कमिटी मध्ये सामील होण्यासाठी इच्छुक कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी मुकुंद सोनवणे व प्रशांत वासनिक यांच्याशी बैठकीमध्ये आपल्या कार्याचा अहवाल देऊन काम करण्याची इच्छा दर्शवावी असेही ते म्हणाले.या कार्यक्रमात प्रशांत वासनिक,अनंत गायकवाड,अविनाश शिंगारे,आकाश शिंदे,सुमेध वक्ते,विध्यासागर हाणवते,समाधान काळुंके,सिद्धार्थ जोगदंड,वसंत बनसोडे,गणेश टेकाळे व इतर प्रमुख कार्यकर्ते उपस्तित होते.

तफ़सीर कुरआन बयान उल-इल्म विधिवत पुस्तकाचे विमोचन

बीड , (दिव्य न्युज):- शहरातील सुप्रसिद्ध कुरआन सेंटरचे संस्थापक नसीर अहेमद खान यांच्या हस्ते सोमवार दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी एशियन टॉवर्स येथे ज्ञान आणि शिक्षणाशी संबंधित पुस्तक तफ़सीर कुरआन चे विधिवत विमोचन करण्यात आले.

इस्लाम धर्मात अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या कुरआन वर आधारित तफ़सीर बयान उल इल्म शिक्षक आणि शिक्षणात रस असलेल्या लोकांसाठी खास आहे. या पुस्तकात एकूण १५ धडे आहेत. जे कुरआनातील श्लोक आणि ४५ व्याख्यांचे अभ्यासपूर्णरित्या अर्थपूर्ण लिहिले गेले आहेत. या पुस्तकात प्रत्येक धड्याच्या शेवटी, प्रतिबिंब, कृती आणि संज्ञानात्मक विकासासाठी एक अभ्यासक्रम सादर केलेला आहे. या पुस्तकात ज्ञान, ज्ञानाची उद्दिष्टे, शिक्षकाची संकल्पना, शिक्षकाची वैशिष्ट्ये, शिकवण्याची पद्धत, आत्मशुद्धी, प्रशिक्षणाची साधने, आवश्यक विद्यार्थी, चर्चा, संशोधन आणि शिक्षकांची भूमिका या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. शिक्षणाच्या समकालीन गरजा लक्षात घेऊन कुरआनातील शिकवणींचा शास्त्रीय अर्थ लावला गेला आहे. यात चार्ट आणि ग्राफिक्सचाही वापर करण्यात आला आहे. याशिवाय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि नैतिक परिस्थितीशी संबंधित राष्ट्रीय स्तरावरील सर्वेक्षण आणि वैज्ञानिक प्रयोगांचाही समावेश करण्यात आला आहे. या पुस्तकाच्या विमोचन सोहळ्यात जमात ए इस्लामी हिंद चे बीड शहराध्यक्ष तथा मार्गदर्शक सय्यद शफीक हाश्मी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उर्दू विभागाचे अशासकीय सदस्य तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सय्यद हसीन अख्तर, व्यावसायिक हमीद देशमुख, डॉ. आमेर आणि पुस्तकाचे लेखक मुहम्मद अब्दुल्ला जावेद (रायचूर कर्नाटक) सहभागी झाले होते. या पुस्तकाच्या विमोचन प्रसंगी पुस्तकाच्या लेखकांनी म्हटले की,

बयान उल-इल्म मध्ये ५०६ पृष्ठे आहेत. तसेच ज्यांना हे पुस्तक हवे आहे त्यांनी ८४४७६२२९१९ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेअंतर्गत जिल्ह्यातील केवळ ३२ जणांना मदत

बीड, (दिव्य न्युज):- गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा सुरक्षा सानुग्रह योजनेंतर्गत जिल्ह्यात एप्रिल २०२४ ते आतापर्यंत १२४ जणांचे प्रस्ताव आले. त्यापैकी ३२ प्रस्ताव मंजूर झाले असून, ६३ लाख रुपये सानुग्रह अनुदान शेतकरी वारसाला मिळाले आहे. या योजनेमुळे शेतकरी वारसांना सुविधा निर्माण होऊन शासन मदत मिळाल्याने दिलासा मिळाला आहे.

शेतात काम करीत असताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा धक्का लागणे आदींसह नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्ता अपघात, वाहन अपघात तसेच अन्य कोणत्याही कारणांमुळे होणारे अपघात यामध्ये बऱ्याच वेळा शेतकऱ्याचा मृत्यू होतो, तसेच अपंगत्व येते.

घरातील कर्त्या व्यक्तीच्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा परिस्थितीत अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला आर्थिक लाभ देण्यासाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यात येत आहे.

शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू झाल्यास किंवा अपंगत्व आल्यास गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेंतर्गत दोन लाख रुपयांची मदत दिली जाते. मात्र, विविध कारणांमुळे प्रस्ताव मान्य होत नाहीत. कागदपत्रांची पूर्तता नसणे हे यातील मुख्य कारण असते. अर्जाच्या तुलनेत कमी प्रमाणात अर्ज मंजूर केले जात असल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यात सर्व आवश्यक कागदपत्रासह तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे अर्ज करावा लागतो.

कोणाला मिळतो लाभ?

शेती करताना शेतकऱ्याला अपघाती मृत्यू होतो. अंगावर वीज पडून मृत्यू होणे, नैसर्गिक आपत्ती, पूर, सर्पदंश, विचूदंश, वाहन अपघात, रस्त्यावरील अपघात, विजेचा शॉक लागून मृत्यू अशा वेगवेगळ्या कारणांमुळे शेतकऱ्याला अपंगत्व किंवा मृत्यू ओढवला जातो. यात शेतकरी कुटुंबाचा आधार जातो. अशावेळी मृत शेतकऱ्याच्या वारसांना ही मदत मिळते.

२ लाख अपघात झाल्यास

महाराष्ट्र सरकारने ही योजना २००५-०६ सुरू केली. तेव्हा त्याचे नाव 'शेतकरी जनता अपघात विमा योजना' असे होते, ते बदलून 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजना' असे करण्यात आले. २००९-१० मध्ये या योजनेसाठी एक लाख एवढा विमा संरक्षित केला गेला होता. पुढे या योजनेचे कल्याणकारी स्वरूप लक्षात घेता २०१५-१६ मध्ये ही रक्कम वाढवून दोन लाख एवढी करण्यात आली.

किती प्रकरणे प्रलंबित ?

गोपीनाथ मुंडे अपघात योजनेचे ८३ प्रस्ताव प्रलंबित असून, कागदपत्राची पूर्तता करणे सुरू आहे. कागदपत्रांची पूर्तता केल्यास वरिष्ठ स्तरावर पाठवून ते अर्ज मंजूर झाल्यास मदत मिळते.

वर्षभरात किती जणांना लाभ?

एप्रिल २०२४ ते आतापर्यंत ३२ जणांच्या कुटुंबीयांना ६३ लाख रुपये सानुग्रह मदत शासनाकडून देण्यात आली आहे.

अर्जात या त्रुट्या निघाल्या

घटना घडल्यास त्या घटनेचा पंचनामा, इन्केवेस्ट पंचनामा, पोलिस समरी, एसडीएम समरी असे विविध कागदपत्रांअभावी अर्ज प्रलंबित राहत असल्ल्याने अडचण होत आहे.

इस्लामपुरा भागातील डीपीचा स्फोट

वेळेवर दुरूस्ती न केल्यामुळे घडली घटना



बीड, (दिव्य न्युज):- शहरातील इस्लामपुरा भागात असलेल्या डीपीचा स्फोट होवून आग लागली सुर्दैवाने या डीपी जवळ कोणी नव्हते त्यामुळे जीवीतहानी टळली. आग विझजविण्यासाठी अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले होते. विज वितरण कंपनीकडून वेळेवर डीपीची दुरूस्ती केली जात नसल्यामुळे आजही घटना घडली आहे.

गोशानशीन दर्गाह, इस्लामपुरा येथील डीपीचा आज सकाळी स्फोट झाला. स्फोटानंतर डीपीने पेट घेतली. घटनास्थळी अनेक नागरीकांनी धाव घेवून आग विझवण्याचा प्रयत्न केला. अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले होते. सुर्दैवाने कोणतीही दुर्दैवी घटना घडली नाही.डीपीची वेळेवर दुरूस्ती केली जात नाही. त्याकडे कधी डुंकूनही पाहितलं जात नाही त्यामुळेच आजही घटना घडली आहे. ज्या ठिकाणी डीपी आहे त्या ठिकाणी नागरीक राहतात. या डीपीच्या बाजुने नागरीक ये जा करत असतात. डीपीची वेळेवर दुरूस्ती करणे हे विज वितरण कंपनीचे कर्तव्य आहे. मात्र या कर्तव्याचा कंपनीच्या कर्मचाऱ्यांना विसर पडला असल्याचे दिसुन येत आहे.

न.प. बीड मधील भ्रष्टाचार संबंधी

उद्या अमरण उपोषण करणार- पठाण

बीड , (दिव्य न्युज):-नगर परिषद बीड मधील मुख्याधिकारी व सबंधीत कर्मचाऱ्यांनी संगणमत करुन बांधकाम, गुंठेवारी, नौकर भरती, कर आकारणी मध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला असून त्यांचे विरुध्द कार्यवाही होत नसल्यामुळे दि.२५ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालया बोड समोर अमरण उपोषण करणार असल्याचे समाजसेवक मुकरमजान पठाण यांनी आपल्या पत्राकात म्हणटले,

या बाबत अधिक माहिती अशी की, नगर परिषद बीड मध्ये तात्कालीन मुख्याधिकारी उत्कृष सोपानराव गुट्टे, सेवानिवृत्त निर्मळ जैन नगर रचनाकार, सय्यद सलीम सय्यद याकुब यांनी संगणमत करुन गुंठेवारी, लेआऊट, बांधकाम परवानगी बांधकाम पूर्णतेचा दाखला देवून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला असल्या बाबतचे पुरावे शासन, प्रशासनाकडे अर्जासोबत सादर करुन ही प्रशासन मधले लोक त्यांना पाठीशी घालत आहे. न.प. बीड निलंबीत उपअभियंता अखील फारुकी यांचे मुलं व भाऊचे नावे असलेले बलभीम कॉलेज समोरील अनाधिकृत बांधकाम, बलभीम चौक बीड येथील वावु लोढा यांचे अनाधिकृत बांधकाम, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहा समोरील अनाधिकृत बांधकाम, सर्वे नं.१०८. ११९ तरफ गिराम बीड मधील रद्द झालेले लेआऊट मधील अनाधिकृत बांधकाम थांविणे व पी.टी. आर वरील नावाची नोंद रद्द करणे,

तसेच न.प.बीड मधील सेवानिवृत्त कनिष्ठ नगर रचना सय्यद सलीम सय्यद याकुब यांचे कारंजा टॉवर जवळील कॉम्प्लेक्स विरुध्द पुरावे देवुनही शासन व प्रशासन कार्यवाही करीत नाही कार्यरत असलेले मुख्याधिकारी निता अंधारे यांनाही संबंधीता विरुध्द कार्यवाही करण्यात यावी म्हणून अनेकवेळा निवेदन देवून ही त्यांनी कार्यवाही न करता स्वतःही भ्रष्टाचाराचे मार्ग स्विकारुन भ्रप्टाचार करणाऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम केले आहे व अनारधिकृत बांधकामाना धारकांना कर आकरणी करुन साथ दिली नगर परिषद बीड मधील नियमबाहय्य नौकर भरती बाबत दि.०९/०४/२०१८ रोजी जिल्हा भ्रष्टाचार समिती मध्ये अर्ज दाखल करुन ही आज पर्यंत कार्यवाही करण्यात आली नाही. मा. जिल्हाधिकारी साहेब बीड यांनी संबंधीत भ्रष्ट अधिकारी कर्मचाऱ्या विरुध्द कार्यवाही आज पर्यंत झाली नाही, दि.२५ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालया समोर अमरण उपोषण करणार असल्याचे निवेदन दि.०७/०१/२०२५ रोजी दिल असल्याचे पत्रकात समाजसेवक मुकरमजान पठाण यांनी म्हणटले आहे.

लोकशाही वर निष्ठा ठेवण्याची घेतली शपथ

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त तहसील कार्यालयासह सर्व कार्यालयात घेण्यात आली शपथ

श्रीक्षेत्र माहूर, (दिव्य न्युज):- राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त शासनाच्या आदेशानुसार माहूरच्या तहसील कार्यालयासह सर्व कार्यालयात विभागप्रमुखांच्या उपस्थितीत लोकशाही वर निष्ठा ठेवण्यासाठी शपथ घेण्यात आली यावेळी तहसील कार्यालयात तहसीलदार किशोर यादव नायब तहसीलदार महाकाल उर्फ कैलास जेठे नायब तहसीलदार डॉ राजकुमार राठोड यांचे सह सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत शपथ घेण्यात आली

यावेळी तहसीलदार किशोर यादव नायब तहसीलदार उर्फ महाकाल कैलास जेठे नायब तहसीलदार डॉ राजकुमार राठोड यांचे सह गटविकास अधिकारी कार्यालयात सुरेश कांबळे यांची उपस्थितीत सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी शपथ घेतली तर नगरपंचायत माहूर येथे मुख्याधिकारी विवेक कांदे कार्यालय अधीक्षक वैजनाथ स्वामी यांचे सह सर्व कर्मचारी उपस्थित होते ग्रामीण रुग्णालय माहूर येथे वैद्यकीय अधीक्षक डॉ किरण वाघमारे तर गटशिक्षणाधिकारी कार्यालयात गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडीया यांचे सह सर्व कर्मचारी उपस्थित होते तर उप कोषागार अधिकारी कार्यालयात उपकोषागार अधिकारी सुमित दळवे तसेच दुय्यम निबंधक कार्यालयात दुय्यम निबंधक कुमारी लता तलांडे यांचे सह वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयात वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव पुरातत्व विभागात सय्यद आजम बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात बालविकास प्रकल्प अधिकारी परमेश्वर भिसे सह भूमी अभिलेख कार्यालयात राम सिद्धमवार तालुका कृषी अधिकारी कार्यालययात तालुका कृषी अधिकारी बालाजी मुंडे यांचे सह सर्व आदेशित कार्यालयात लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्यात आली

दिनांक २५ जानेवारी रोजी सुट्टी असल्याने शासनाच्या आदेशानुसार दिनांक २४ जानेवारी रोजी सर्व संबंधित कार्यालयात राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्यात आल्याची माहिती तहसीलदार किशोर यादव यांनी दिली आहे.

किनवट तालुक्यातील रेशनच्या धान्याच्या मापात पाप

क्विंटलमागे तिन ते चार किलो धान्य कमी, दुकानदारांना नुकसान

किनवट , (दिव्य न्युज):- किनवट,मांडवी व इस्लापूर या तालुक्यातील तीन शासकीय गोदामातून स्वस्त धान्य दुकानदारांना द्वारपोच होणाऱ्या अन्नधान्य पुरवठ्यामध्ये क्विंटलमागे तिन ते चार किलो धान्य कमी येत असून यामुळे तालुकाभरात द्वारपोच अन्नधान्य योजनेच्या मापात पाप असण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

राज्यात कोणीही उपाशी राहू नये, त्यांना कमी पैशात अन्नधान्य उपलब्ध व्हावे. त्यांचा आर्थिक स्तर उंच व्हावा म्हणून शासनाने गरिबातल्या गरीब नागरिकांसाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा ही योजना सुरू केली. यासाठी अन्नसुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांना मोफत गहू व तांदूळ देण्याचा निर्णय तत्कालीन केंद्र सरकारने घेतला. तेव्हापासून नागरिकांना मोफत धान्य वितरित केल्या जात आहे. पण शासनाच्याच शासकीय गोदामातून द्वारपोच होणाऱ्या अन्नधान्य पुरवठ्यामध्ये एका पोत्यामागे दोन ते तीन किलो धान्य कमी येत आहे. अन्नधान्य कमी येत असल्यामुळे दुकानदारांना नुकसान झेलावे लागत आहे.पर्यायाने त्या नुकसानीचा फटका गोरगरीब लाभार्थ्यांना बसत आहे.

उबाठाचे १५, काँग्रेसचे १० आमदार संपर्कात

शिंदेंच्या शिलेदारानं भूकंपाची तारीख सांगितली

मुंबई, (दिव्य न्युज):- महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठा भूकंप घडणार असल्याची चर्चा जोर धरु लागली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासह दावोस दौऱ्यावर गेले आहेत. तर इकडे महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साताऱ्यातील त्यांच्या दरे गावात गेले आहेत. त्यामुळे उलटसुलट चर्चा सुरु असताना शिवसेना उबाठा, काँग्रेसच्या नेत्यांकडून उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याबद्दल खळबळजनक दावे करण्यात आले आहेत.

एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत नव्या नेत्याचा उदय झाला. त्या नेत्यासोबत २० आमदार आहेत, असा दावा करत शिवसेना उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी एकच खळबळ उडवून दिली. सामंत यांच्या मागे २० आमदारांचं बळ आहे. शिंदेंना याची माहिती मिळताच त्यांनी मुख्यमंत्रिपदासाठी दबावाची रणनीती बदलली आणि उपमुख्यमंत्रिपद स्वीकारण्याची तयारी दर्शवली, असा सनसनाटी दावा राऊत यांनी केला.यानंतर शिवसेनेच्या गोटातून माजी खासदार राहुल शेवाळेंनी मोठा दावा केला आहे. 'काँग्रेस, उबाठाचे अनेक आमदार संपर्कात आहेत. उबाठाचे १५, काँग्रेसचे १० आमदार संपर्कात आहेत. हे दोन्ही पक्ष फुटू शकतात. त्यामुळे त्यांनी दुसऱ्यांच्या उदयापेक्षा स्वत:च्या पक्षांच्या होत असलेल्या अस्ताची काळजी करावी. २३ जानेवारीला मोठा राजकीय भूकंप होणार आहे. त्यामुळेच संजय राऊत, विजय वडेट्टीवार खोट्या बातम्या पसरवत आहेत,' असं शेवाळे म्हणाले.

राऊतांच्या खळबळजनक दाव्यानंतर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तातडीनं स्पष्टीकरण दिलं. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसाठी दावोसला गेलेल्या सामंत यांनी एक व्हिडीओ जारी केला. 'संजय राऊत यांनी माझ्याबद्दल केलेलं वक्तव्य ऐकलं आणि बघितलं. मला वाटतं हा धादांत राजकीय बालिशपणा आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी जो उठाव केला, त्यामध्ये मी सामील होतो. त्यामुळेच मला दोनवेळा उद्योगमंत्रिपद मिळालं याची जाणीव आहे. सर्वसामान्य नेत्यानं राजकीय जीवनामध्ये मला घडवण्यासाठी जे प्रयत्न केले, ते मी कधीही विसरू शकत नाहीत. माझे आणि एकनाथ शिंदे यांचे राजकारणाच्या पलीकडचे संबंध आहेत. त्यांच्यात आणि माझ्यात भांडण लावण्याचा केविलवाणा प्रयत्न केला तर तो यशस्वी होणार नाही', असं उदय सामंत यांनी म्हटलं.

बिनधास्त खा,उकडलेली अंडी, चिकन

अफवा न पसरवण्याचे पशुसंवर्धनचे आवाहन

नेकनूर , (दिव्य न्युज):- बर्ड फ्लूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, पशुसंवर्धन विभाग अलर्ट झाला आहे. जिल्हा प्रशासनाकडूनही उपाययोजना करण्यात येत आहे. उकडलेली अंडी, चिकन खाणे पूर्णपणे सुरक्षित असल्याची माहिती पशुसंवर्धन विभागाने दिली आहे. तसेच बर्ड फ्लूबाबत कोणीही अफवा पसरवू नये, असे आवाहनही केले आहे.

चिरनेर येथील मृत पक्ष्यांचे नमुने बर्ड फ्लू एच५एन१ आढळल्याचे राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशुरोग मार्गदर्शक सूचना जारी बर्ड फ्लूची तीव्रता व गंभीरता

लक्षात घेऊन राज्यातील सर्व जिल्ह्यांना सतर्कता बाळगण्याच्या सूचना क्षेत्रीय स्तरावर दिल्या आहेत. तसेच रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये, म्हणून खबरदारीच्या उपायांबाबत पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शक सूचना परिपत्रक जारी केले आहे.संस्थानकडून कळवण्यात आले आहे. त्या अनुषंगाने, केंद्र सरकारच्या रोगप्रादुर्भाव प्रतिबंध व नियंत्रण राष्ट्रीय कृती आराखड्यानुसार, बाधित केंद्रापासून एक किलोमीटर परिसर बाधित म्हणून घोषित करण्याचे आदेश रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. तसेच बाधित क्षेत्रातील १,२३७ पक्षी, १७७ अंडी व २७० किलो खाद्य, ५० किलो तुस व १० रिकाम्या गोणी नष्ट केल्या आहेत. या करिता संबंधित कुक्कुटपालकांना नुकसानभरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.उकडलेली अंडी, चिकन खाणे पूर्णपणे सुरक्षित आहे. त्यामुळे अंडी व चिकन शिजवून खाण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. तसेच कोठेही पक्ष्यांमध्ये मरतुक असल्यास तत्काळ पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये माहिती द्यावी. तसेच पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या टोल फ्री दूरध्वनी क्रमांक १८००२३३०४१८/१९६२ वर माहिती द्यावी. बर्ड फ्लूबाबत गैरसमज व अफवा पसरवू नये.

मातृभाषेतला संवाद हा हृदयापर्यंत पोहोचतो- ज्ञानेश्वर वाघचौरे

लासुर , (दिव्य न्युज):- लासूर स्टेशन भाषा हे संवादाचे प्रभावी माध्यम आहे.मातृभाषेतला संवाद हा सहज सोपा असून तो हृदयापर्यंत पोहोचतो. मातृभाषा मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असून तिच्या विकास आणि संवर्धनाची जबाबदारी आता समाजाला घ्यावी लागेल. यात साहित्यिकांची जबाबदारी मोठी असल्याचे प्रतिपादन त्यांनी केलं. देवगाव रंगारी (ता. कन्नड) येथील आसारामजी भांडवलदार कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा विकास व संवर्धन पंधरवडा निमित्ताने आयोजित व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.नवनाथ आघाव सर तर विचार पिठावर उपप्राचार्य डॉक्टर वसंत माळी सर,मराठीचे विभाग प्रमुख प्रा. डॉ.संतोष जाधव सर, प्रा. जयश्री भांडवलदार मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी त्यांनी आपल्या स्वलिखित काव्यरचना सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. ओ साहेब माझ्या मुलाला कार्यकर्ता म्हणून आपल्या पक्षात घ्याल का या काव्यरचनेत विद्यमान राजकीय परिस्थितीच विदारक चित्रण त्यांनी मांडलं.

मी उन्हाळा हिवाळा अनेक पावसाळ्या सोबत लढलो खरीप आणि रब्बीच पीक सडलं तरीही मी घडलो तो आता जिल्हा परिषद पंचायत समिती ग्रामपंचायत लढाईची म्हणतोय दोन एकर जमीन विकायची म्हणतोय, विकली तर विकू द्या त्याच्या तिकिटाचं तेवढं तुम्ही बघाल का? ओ साहेब माझ्या मुलाला कार्यकर्ता म्हणून तुमच्या पक्षात घ्याल का? राजकीय कार्यकर्त्याच्या बापाचा दुःख त्यांनी या कवीतून मांडलं! तर प्रेम कविता सादर करताना हसतेस आणि पदराआड लपवतेस चेहरा पाहण्यास येईल पुन्हा पुन्हा तू झोपली की जग झोपले असे वाटते या दुनियेस खोडी काढण्यास स्वप्नात तुझ्या येईल पुन्हा पुन्हा या कवितेला उपस्थित विद्यार्थ्यांनी विशेष दाद दिली. मराठी भाषा विकास व संवर्धन पंधरवडा निमित्ताने विविध साहित्यिकांना बोलवून महाविद्यालय उपक्रम राबवत आहे. या माध्यमातून मराठी भाषा टिकवण्याला आणि संवर्धन करण्याला बळकटी प्राप्त होईल अस अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. नवनाथ आघाव म्हणाले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी पूजा गायकवाड प्रास्ताविक प्राध्यापक डॉ. संतोष जाधव तर आभार डॉ. ललिता गोपाळ यांनी मानले

नवनिर्माण प्राथमिक शाळेत क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण सोहळा संपन्न

पाटोदा , (दिव्य न्युज):- नवनिर्माण प्राथमिक शाळा क्रांतीनगर पाटोदा या शाळेत वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन उत्साहात पार पडले. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये आपल्या कौशल्याचे प्रदर्शन केले. क्रिकेट, कबड्डी,धावणे, संगीत खुर्ची आणि शर्यतींसारख्या खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

बक्षीस वितरण सोहळा नवनिर्माण प्राथमिक शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुणे म्हणून वसंतराव नाईक माध्यमिक शाळेचे प्राचार्य श्री.तुकाराम तुपे, नगरसेविका सौ. निर्मलाताई संतोष जाधव, नगरसेविका सौ रुपालीताई संदीप जावळे या उपस्थित होत्या . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त उपशिक्षणाधिकारी श्री रत्नाकर जायभाये हे होते. प्राचार्य श्री. तुपे सर यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातील महत्त्व पटवून दिले व खेळामुळे शारीरिक आणि मानसिक विकास कसा होतो, याबाबत मार्गदर्शन केले.अध्यक्ष स्थानावरून बोलताना श्री जायभाये सर यांनी विजेत्यांचे कौतुक करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले.नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीचे औचित्य साधून कार्यक्रमाची सुरुवात नेताजीच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. यानंतर स्पर्धांमध्ये विजेते ठरलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना पदके व प्रमाणपत्रे देण्यात आली. विविध स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री.जायभाये सर, डोके सर, खाडे सर, बांगर सर, श्रीम. सानप मॅडम, श्रीम. बडे मॅडम आणि श्रीम. बांगर मॅडम यांचे विशेष योगदान लाभले. पालकांनीही या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे प्रोत्साहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक पठाण सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. जायभाये सर यांनी मानले. या सोहळ्याने विद्यार्थ्यांमध्ये नवीन ऊर्जा व उत्साह संचारला असून क्रीडा क्षेत्रात पुढे प्रगती करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

डिजिटल मीडिया पत्रकार संघटनेच्या सचिवपदी सचिन बिद्री

संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी केली निवड

बीड, (दिव्य न्युज):- पत्रकारिता अन् त्यासोबत सामाजिक भान राखून जनजागृतीपर उपक्रमाने पत्रकारिता क्षेत्रात मराठवाड्यात एक वेगळा ठसा उमटवीणारे उमरगा शहरातील पत्रकार सचिन बिद्री यांची डिजिटल मीडिया पत्रकार संघटनेच्या धाराशिव जिल्हा सचिव पदी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी दि १९ रोजी तुळजापूरच्या शासकीय विश्राम गृहात आयोजित पत्रकारांच्या बैठकीत निवडीचे पत्र देत सत्कार केले.

जिल्हा कार्यकरणीची निवड करताना उमरग्यातील पत्रकार श्री बिद्री यांची प्रामुख्याने दखल घेत,सोशल मीडियावर बिद्री यांचे वाढते फॉलोव्हर्स आणि डिजिटल मीडियाच्या माध्यमातून होणारी पत्रकारिता,समाज प्रबोधनापर शॉर्टफिल्म आदी बाबींची दखल घेण्यात आल्याचे संघटनेचे राज्य समन्वयक इकबाल शेख यांनी यावेळी सांगितले.यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा राजकीय विश्लेषक, जेष्ठ पत्रकार राजा माने यांच्यासह उपाध्यक्ष सतीश सावंत, सुभाष चिंदे, इकबाल शेख आदी मान्यवर आणि जिल्ह्यातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०